# UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Westerm Regional Office (WRO) Pune**

# MINOR RESEARCH PROJECT

**Financial Assitance Under 11th Plan**

**- Subject -**

**"Thorough Study of Child Labour, Human Rights in Amravati Town"**

**"अमरावती शहरातील बाल मजुरांच्या मानव अधिकारांचा सर्वांगीण अभ्यास"**

**Mr. V.R. Dhengale**
**Head Dept. of Political Science**
**S.S.S.K.R. Innani Mahavidyalaya,**
**Karanja (Lad) Dist. Washim (M.S.)**

**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**
**2010 - 2011**

## संशोधनाचे महत्व

बाल मजुरीच्या समस्येने भारतात भयावह स्वरूप धारण केले आहे. पालक आपल्या पाल्यांना मजुरी करण्याकरिता का पाठवतात? या गोष्टीचा शोध घेण्यासाठी, पालकांची कौटुबिक, सामाजिक व आर्थिक पृष्ठभूमी तपासून, या समस्येचे निमुर्लन करण्यासाठी, त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन ते आपल्या सर्वागिन विकासाकडे वाटचाल करतील यासाठी, त्यांच्या मानवाधिकारांचे रक्षण होवून, उत्तम नागरिकांची निर्मिती होण्यासाठी, प्रस्तुत लघु शोध प्रकल्प महत्वाचा ठरणारा आहे. सरकार, स्वयं सेवी संघटना इ. देखिल प्रस्तुत संशोधन मार्गदर्शक ठरणारे आहे म्हणून प्रस्तुत लघु शोध प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

## गृहितके

अमरावती शहरात बाल मजुरांची संख्या दखल घेण्याजोगी आहे पालक आपल्या पाल्यांना आपल्या सोबत किंवा विविध ठिकाणी काम मजुरी करण्यासाठी पाठवतात. बालमजुरांचे मानवाधिकार डोळ्या समोर ठेवून त्यांची चाचपणी करण्यासाठी खालील गृहीतकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

१) बालमजुरी उत्पतीचे कारण दारिद्र आहे.

२) बाल मजुर मानवाधिकारांपासून वंचित आहे.

३) बाल मजुरांच्या मानवाधिकारांचे संरक्षण भारतीय संविधान, न्यायपालिका व शासन करतांना दिसत आहे.

## उद्देश

बाल मजुरीच्या समस्येचे निराकरण करण्या हेतू खालील उद्दीष्टांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

१) बाल मजुरीच्या समस्येच्या उत्पतीच्या कारणांचा शोध घेणे.

२) बाल मजुरीच्या दुष्परिणामांची चर्चा करणे.

३) बाल मजुरी प्रतिबंध संदर्भात स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्यांतर काळखंडात सरकार कडुन केल्या गेलेल्या भूमिकेचे अध्ययन करणे.

४) बालमजुरीच्या संदर्भात संविधान सभेत झालेल्या चर्चेचे अध्ययन करणे.

५) भारतीय संविधानात बालमजुरी प्रतिबंधक विषयक तरतुदींचे अध्ययन करणे.

६) भारतीय संविधान बाल मजुरी प्रतिबंध संदर्भात करण्यात आलेल्या संविधान सुधारणाचे अध्ययन करणे.

७) भारतीय न्यायपालीकेच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

८) बाल मजुरांच्या मानवाधिकारांचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**समग्र :-**

अमरावती शहरातील अंतर्गत येणारे हॉटेल, धाबे, भोजनालय, बांधकाम निर्मिता इ. ठिकाणी काम करणारे बाल कामगारांचा समावेश प्रस्तुत लघुशोध प्रकल्पात करण्यात आलेल्या आहे.

**नमुना :-**

अमरावती शहरातील काम करणारे प्राथमिक तथ्याच्या आधारावर २५० कामगार आढळले त्यापैकी नमुना दाखल अध्ययन करण्यासाठी २० टक्के बाल कामगारांची लॉटरी तंत्राचा आधार घेवून निवड करण्यात आली आहे.

## तथ्य संकलन पध्दती

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेवून करण्यात आलेले आहे. प्राथमिक स्त्रोतांचा आधार घेवून बालकांच्या वास्तव स्थितीचे अध्ययन करण्यात आलेले आहे. असे तथ्य संकलन करण्या करिता खालील पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**निरीक्षण :-**

तथ्य संकलन करण्यासाठी निरीक्षण हि एक योग्य पध्दत आहे. याद्वारे सर्व अशा सर्व प्रश्नांचे उत्तर प्राप्त केले जावू शकते जे अनुसुचित विचारल्या जाणे शक्य नसते.

प्रस्तुत अध्ययनात निरीक्षन तंत्राचा वापर करण्यात आला. संशोधनकाने बाल मजुरांच्या अध्ययनामध्ये बालमजुराची कौंटुबिक सामाजिक

आर्थिक स्थिती इ. निरिक्षण करुन तथ्य संकलीत केले. त्याची नोंद नोंद वहीत नोंदवली. या तथ्यांचा विश्लेषणात उपयोग करण्यात आला.

**अनुसूची :-**

प्रस्तुत अध्ययनाचे उद्देश पूर्ण करण्या करिता अर्थात तथ्य प्राप्त करण्याकरिता अनुसुची बनविण्यात आली. अनुसूचित अधिकांश प्रश्नांचे उत्तरे दिल्या गेले, जेणे करुन तथ्य विश्लेषन करणे सुलभ होईल.

**मुलाखत :-**

संशोधनात तथ्य संकलणाकरिता मुलाखत हि एक योग्य पध्दत आहे. ज्या द्वारे संशोधक उत्तर दात्यांच्या उत्तरांचा निर्णय योग्य पध्दतीने करु शकतो. प्रस्तुत संशोधनात संशोधन कत्याने बाल मजुर पालकांकडुन तथ्य संकलन करण्यासाठी याच पध्दतीचा वापर केला गेला. मुलाखतीला अनौपचारिक बनविण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला गेला शक्यतोर उत्तर दात्यांच्या बोली भाषेतून संवाद साधण्याचा प्रयत्न केला गेला जेणे करुन ते योग्य माहिती देवू शकतील.

**दुय्यम स्त्रोत :**

विभिन्न प्रकाशित तसेच अप्रकाशित पुस्तके, गॅजेट, मासिके, वर्तमान पत्रे इ. दुय्यम साधनांचा वापर करुन तथ्य संकलीत करण्यात आले.

**अनुसूची निर्मीती :-**

उपलब्ध प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्याचे अध्ययन केले गेले.क्षेत्र निरिक्षण केल्यानंतर अनसूची निर्माण करण्यात आली. त्यात विभिन्न तथ्यांची जाणी होण्या करिता योग्यती संभावित उत्तरे दिल्या गेली. ज्यात तथ्य संकलन, वर्गीकरण सादरीकरन तसेच विश्लेषण करण्सास सुलभ होईल.

प्रस्तुत अध्ययना करिता खालील अनुसूच्या निर्माण करण्यात आल्यात:-

**बालमजुर :-**

या मध्ये बाल मजुरांना विचारले जाणारे प्रश्न आहेत. विस्तृत माहिती प्राप्त करण्यासाठी तिचे विभाजन केले गेले जेणेकरुन बाल मजुरांच्या संदर्भात विभिन्न पैलुवर कौटुंबिक, सामाजिक आर्थिक कामाच्या ठिकाणाची

स्थिती, बाल मजुरांच्या अडचणी इ. चे प्रस्तुत अध्ययण सुलभ रितीने विश्लेषण करता येईल.

**पालका करिता :-**

बाल मजुरांच्या आई-वडिलांची कौटुंबिक स्थिती, पाल्यांना कामावर पाठविण्याचे कारणे, त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा इ. तथ्य संकलसासाठी पालकांची अनुसूची तयार करण्यात आली जी माहिती पाल्यां कडून मिळाली नाही ती माहिती पालकांकडून मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला, अशाप्रश्नांचा समावेश अनुसूचीत करण्यात आला.

**अनुसूचीचे पूर्व परिक्षण :-**

अनुसूचीचे पूर्व परिक्षण करणे अत्यंत आवश्यक असते करिता दोनही सूचीची निर्मिती झाल्यानंतर १०% उत्तरदात्याशी मुलाखत करुन पूर्व परिक्षण केले गेले व त्या आधारावर अनुसूची मध्ये आवश्यक त्या सुधारना केल्या गेल्या.

**तथ्यांचे विश्लेषण :-**

प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेवून तथ्य संकलंन करण्यात आले तथ्यांचे वर्गीकरण तसेच सारणीकरण करुन गणितीय पध्दतीचा वापर करु विश्लेषण करण्यात आले.

# *निष्कर्ष*

**बालमजुर निवासाच्या मानवाधिकरापासून वंचित आहे.**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने समग्रातून नमुना दाखल ५० बालमजुरांची निवड करण्यात आलेली आहे. सर्वेक्षण, निरीक्षणाच्या दरम्यान जी गोष्ट दृष्टिस पडली ती म्हणजे ५० बालमजुरांच्या घरांपैकी ३५ म्हणजे ६८% घरे ही पक्की घरी नव्हती ती टिनाची आढळजी. १० घरे म्हणजे २०% घरे ही लाकूड तुराट्यांना माती छापलेली आढळली ६ घरे म्हणजे १२% घरे ही विटा रचून व त्यावर टिन टाकलेली आढळली अर्थात अजूनही बालकामगारांना निवासाच्या. मानवाधिकारांची पूर्तता झाली असल्याचे दिसून येत नाही.

**बालमजुर पाण्याच्या अधिकारांपासून वंचित आहे.**

अनुसूचीच्या माध्यमातून बालकांना असा प्रश्न विचारण्यात आला होती की पाण पुरवठा होतो काय? कसा होतो? तर ५० पैकी ४० बालकांना सार्वजनिक नळाच्या माध्यमातून होतो असे उत्तर दिले तर केवळ १० बालकांनी घरगुती नळाद्वारे होतो असे उत्तर दिले.

वरील प्रश्नाला पुरक प्रश्न जेव्हा असा विचारण्यात आला तो असा की पाणीपुरवठा नियमित होतो काय तर ५० पैकी ३५ मुलांनी नाही असे उत्तर दिले.अर्थात अजुनही ४०% बालमजुरांच्या घरी घरगुती नळाची व्यवस्था नाही. ते सार्वजनिक नळाच्या पाण्याचा वापर करतात आणि ३५% बालाकांच्या मते पाणीपुरवठा हा नियमित होत नाही अर्थात पाण्याच्या अधिकारापासून देखिल हे वंचित असल्याने आढळते.

**बालमजुर आरोग्याच्या अधिकारापासून वंचित आहे.**

अनुसुचीच्या माध्यमातून उत्तरदात्याला असाप्रश्न विचारण्यात आला की, सरकारी दवाखाण्याची व्यवस्था आहे काय? सरकारी दवाखाण्याची व्यवस्था नाही असे ५० पैकी ४५ उत्तर दात्यांनी उत्तरे दिली. पाच उत्तर दाते मात्र होय म्हणाले अर्थात आरोग्याच्या अधिकारापासून बालमजूर वंचित आहे हे सिद्ध होते.

**बालमजुर क्रिडा अधिकारांपासून वंचित आहेत.**

खेळाने बालकांचे शरीर पुष्ट होते तर मनोरंजानाने आळस दुर होतो अनुसूचीच्या माध्यमातून जेव्हा असाप्रश्न विचारण्यात आला की, मैदाने, व्यायामशाळा तसेच मनोरंजनाच्या काही व्यवस्था आहे काय ४४ बालकांनी नाही असे उत्तर दिले तर ६ नी होय असे उत्तर दिले अर्थात ८८% बालक अजुनही खेळ आणि मनोरंजनाच्या अधिकारांपासून वंचित असल्याचे सिद्ध होते.

अनुसूचीच्या माध्यमातून जेव्हा उत्तरदात्यांना असा प्रश्न विचारण्यात आला होता की सकस पुरेसा आहार मिळतो काय? सकस व पुरेसा मिळत नाही, असे ३० उत्तरदात्यांनी उत्तर दिले २० उत्तरदात्यांनी नाही, असे उत्तर दिले अर्थात ६०% बालमजुर अजुनही सकस व पुरेश्या आहाराच्या अधिकारापासून वंचित आहे.

सर्वेक्षण व निरीक्षणानुसार ५० पैकी १७ म्हणजे ३४ बालमजुर निरक्षर आढळले, २२ म्हणजे ४४% बालमजुर प्राथमिक शिक्षणापर्यंत पोहचले आढळले तर ११ म्हणजे २२% मुले ७ वी पर्यंत शिकलेले दिसून आले ५६% बालकामगारांना प्राथमिक शिक्षण अधिकाराचा लाभ मिळत नाही. असे सिद्ध होते.

अभ्यासकाने सर्वेक्षण, निरीक्षण मुलाखती इ. तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर करुन जी तथ्य गोळा केली त्यावरुन अस निष्कर्ष काढला की बालमजुरीचे

उत्पत्तीस्थान हे कौटुंबिक दारिद्र हे होय अज्ञानामुळे मद्यपेयाचे प्रमाण अधिक आहे. कुटुंबात सदस्य संख्या अधिक आहे त्यामुळे गरजा भागत नाही परिणामत: कुटुंब दारिद्रयाच्या खाईत लोटले जाते. कुटुंबाची आर्थिक गरज भागविण्यासाठी पालक बालकांना मजुरी वर पाठवतात म्हणूनच बालमजुरी उगमस्थान दारिद्रय हे आहे असा निष्कर्ष निघतो.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने जे अध्ययन करण्यात आले त्या अनुषंगाने असा निष्कर्ष निघू शकतो की, संविधान सभेत जसे ३० मार्च १९४७ रोज मुलभूत अधिकारांच्या उपसमितीत चर्चा, ३ डिसेंबर १९४८ रोजी चर्चा इ. चर्चा बाल मजुरांच्या अधिकारा संदर्भात झालेली होती.

तसेच भारतीय संविधानात कलम १५ (३) २१A कलम २४ ३९(च) इ कलमे बाल अधिकारा संदर्भात आढळतात अर्थात संविधान स्तरावर बाल मजुरीवर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात आले.

बाल मजुरांच्या अधिकार रक्षणासाठी शासन व न्यायालय याने महत्वाची भूमिका बजावली असल्याचे दिसून येते जसे कारखाना अधिनियम १८८१,१८९१,१९०१,१९२२, १९४८ , बालमजुरी प्रतिबंधक अधिनियम १९८६ इ.

तसेच सर्वोच्च न्यायालयाने देखिल ३१ आक्टोबर १९९० मध्ये एका याचिकेद्वारे सरकारला असा निर्देश दिला की बाल अधिकारांचे सरंक्षण करण्याची व्यवस्था करावी.

# शिफारस

राष्ट्र कोणतेही असो: विकसीत अथवा विकसीत, बालकांचे महत्व मात्र सारखे असते; तरीपण अविसित देशात बालकांच्या समस्येचे स्वरुप भयावह असते. अशा राष्ट्रात दारद्रय , बेरोजगार भुकबळी निरक्षरता मागासलेण अधिक असते. परिणामत: बालके मानसिक व शारिरिदृष्ट्या कमकुवत आढळतात. अशी ही भयावह समस्या समाप्त करण्यासाठी, समस्येवर अकुंश लावणे महत्वाचा ठरतो.

## संगठीत प्रयत्न:

बालमजुरीचे निंमुर्लन करण्यासाठी सर्वांनी संघटीत होवून समाप्तीचा संघटीतपणे प्रयत्न केला पाहीजे. ही समस्या उद्‌भवण्याचे अनेक कारणे आहेत; दारिद्र, लोकसंख्या, निरक्षरता इ. ही कारणे नष्ट करण्यासाठी ठोस असा कार्यक्रमत आख़ण्यात आलेला नाही. तो आखण्याची गरज आहे. या समस्येचे पैलू अनेक आहेत. समस्येचे निराकरण करण्याहेतू सरकार, मालक श्रमसंघठन, स्वैच्छिक संघटन, बुद्धीजीवी समाज, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, नी संयुक्त प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## वयस्क बेरोजगारीचे निमुर्लन.

बालमजुरी ही दारिद्रयाची देणे आहे जापर्यंत दारिद्रय दूर केले जात नाही तोपर्यंत अशा ह्या समस्येपासून सुटका होणे शक्य नाही. बालमजुराच्या कुटुंबातील एका व्यक्तीला रोजगार देवून त्या कुटुंबातील उत्पन्न वाढवून ह्या समस्येवर काही प्रमाणात का होईना नियंत्रण ठेवल्या जावू शकते.

## शंभर टक्के लाभ लाभार्थींना मिळाल्यास

सरकारी योजनांची दिल्लीत घोषणा झाल्यांनतर लाभार्थीपर्यंत पोहचेस्तोवर ५% पैसाच लाभार्थींना मिळतो ९५% पैसा मध्येच गळप होतो. योजनांचा १०० टक्के लाभ बालमजुरास त्यांच्या कुटंबास मिळाल्यास बालमजुरीवर नियंत्रण ठेवल्या जावू शकते.

गरिबी निर्मुलनाची माहिती तसेच बेरोजगारी निर्मुलनाच्या लाभाची माहिती बाल मजुरांपर्यत पोहचली पाहिजे. असे सारे प्रयत्न ज्यात गरिब परिवारावर पडणारा आर्थिक दबाव, निरक्षेरतेचा अंध:कार दूर झाला पाहिजे. अशा ह्या कार्यक्रमाच्या माध्यमातून बालकांच्या शारिरीक, मानसिक, सामाजिक आध्यात्मिक तसेच नैतिक विकास सुनिश्चित केला गेला पाहिजे. समाजातील सर्व स्तरातील लोकांनी या कार्यक्रमात सहभागी होवून हि समस्या संपविण्यास वचनबद्ध असले पाहिजे. तरंच समस्येवर नियंत्रण ठेवल्या जावू शकते अन्यथा कोऱ्या भाषनाने पोट भरत असले तर मगअन्नाची गरज कशाला आवश्यक आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रकल्पांच्या आधारावर आपण असे म्हणू शकतो की बालमजुर मात्र अत्यंत अदनीय स्थितीत जीवन जगत आहे. त्यांचे शोषण होत आहे. असा या समस्येचे समाधान करण्यासाठी संशोधकाच्या दृष्टिने खालील उपयांनी पूर्णपणे समाधान होवू शकत नाही परंतु विशिष्ठ स्तरापर्यंत नियंत्रण केल जावू शकते.

१ बाल मजुरांच्या कौटुंबिक आर्थिक परिस्थितीचे निरिक्षण करुन त्यांना पुरेसे सहाय्य करावे.

२ बालमजुरांच्या पालकांशी संवाद साधून शिक्षणाप्रती त्यांना जागृत करुन बालकांना शाळेत पाठवण्याबाबत प्ररित करणे.

३ ज्या भागामध्ये हे बालमजुर निवास करतात अशा ठिकाणी बालमजुर शिक्षण एक पूनवर्सन केंद्र चालविले जावे.

४ कामगार विभागतील प्रशासकीय अधिकाऱ्यांवर बालमजुरी थांबविण्यासाठी विशेष जबाबदारी सोपविण्यात यावी त्यासाठी त्यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात यावे

५ बालकामगारांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला त्याच्या योग्यतेनुसार सरकारी नौकरी देण्यात यावी.

६ सर्व प्रकारच्या कामांध्ये बालमजुरींवर प्रतिबंध लावण्यात यावे.

७ बालमजुरीचे मुख्य कारण त्यांची असलेली दयनिय आर्थिक परिस्थिती अशा या समस्येचे समाधान करण्यासाठी सरकार कडून त्यांच्या आईवडिलांना मासिक पेन्शनची व्यवस्था करण्यात यावी.